Mhajan sir - 32

# कार्यालय नगर परिषद, मोर्शी, जि. अमरावती

जावक क्र. मोनप/वियो/सनर/नअ/ ५६५ /२०१९ दिनांक ०९/०६/२०१९.

**प्रति,**

**१. आरीफ हारुन कासमानी**
**२. इकबाल हारुन कासमानी**
**३. हमीदा उर्फ राबुबाई हारुन कासमानी**
**४. हारुन अलीमहंमद कासमानी**
रा. वर्धा ता. जि. वर्धा

**विषय :- विकास योजना मोर्शी जि. अमरावती न.प हद्दीतील मौजा येरला येथील शेत स.नं. १७३/२ ब १.६३ हे. जमीन अकृषीक करण्याकरीता ना हरकत प्रमाणपत्र देणेबाबत.**

**संदर्भ :-** मा. सहाय्यक संचालक, नगर रचना व मुल्यनिर्धारण विभाग अमरावती शाखा पत्र जा.क्र. अकृषक/मौ.मोर्शी/ता. मोर्शी स.न. १७३/२ब/ससनर अम/४६१ दिनांक ८.०३.२०१९ आपण न.प. कडे दिनांक ८.०५.२०१८ रोजी न.प. कडे केलेला अर्ज

वर उल्लेखित विषयास तसेच संदर्भांकित अर्जास, पत्रास अनुसरुन कळविण्यात येते की, पत्र जा.क्र. अकृषक/मौ. येरला/ ता. मोर्शी /स.न. १७३/२ब/ससनर-अम/४६१ दिनांक ८.०३.२०१९ अन्वये अंतीम शिफारस केल्याप्रमाणे आपणास महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ मधील तरतुदीनुसार खालील शर्ती व अटीवर तात्वीक स्वरुपात ना हरकत प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

१. सोबतच्या अभिन्यास नकाशास नगर रचनाकार, मोर्शी यांनी अंतीम शिफारस केल्याप्रमाणे मौजा येरला येथील शेत स.नं. १७३/२ब मधील ८१६९.८८ चौ.मी. हि निवासी उपयोगाकरीता परावर्तीत प्रथम करावी लागेल.
२. महाराष्ट्र जमीन महसुन संहिता १९६६ चे कलम ४४ मधील तरतुदीप्रमाणे महसुल अधिकारी कडुन अकृषक आकारणी झाल्यानंतर आणि विषयांकित अभिन्यास मंजुर केल्यानंतर त्या लेआऊट मधील रस्ते इत्यादी विकास कामे झाल्यानंतर न.प. कडे हस्तांतरीत करावे लागेल.
३. प्रश्नांकित रहिवासी प्लॉट मधुन जास्त दाबाची विद्युत लाईन किंवा टेलीफोन लाईन जात असेल तर आपण आपल्या स्वखर्चाने रस्त्यांच्याकडेला स्थानांतरण करावे.
४. प्रश्नांकित ना हरकत प्रमाणपत्र एक वर्षापर्यंत वैध राहील आणि ह्या एक वर्षाच्या आत आपण न.प.कडुन अभिन्यास नकाशास महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनिय १९६६ चे कलम ४५ व महाराष्ट्र नगर परिषद, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १८९ प्रमाणे मंजुर करुन घ्यावी लागेल. अभिनयासातील रस्ते, खुली जागा इत्यादी आपण स्वखर्चाने विकसीत करुन ते न.प. कडे एक रुपया घेवुन हस्तांतरीत करावे व त्याप्रमाणे हक्क सोडल्याचा लेख रुपये २००/- स्टॅम्प पेपरवर करुन नोंदणीकृत करुन द्यावा लागेल. एक वर्षाच्या आत वर उल्लेखित कामे न केल्यास आपले ना हरकत प्रमाणपत्र रद्द करण्याचा अधिकार राहील.

५. मा. आयुक्त, तथा संचालक, नगर परिषद, प्रशासन, मुंबई यांनी निर्गमीत केलेले स्थायी निदेश क्र. ३३ मधील सर्व अटी आपणावर बंधनकारक राहील. अतिमत: मंजुरात झाल्याशिवाय प्लॉट विकता येणार नाही.

६. करारनाम्यामधील शर्ती व अटी आधि करारनामाच्या शर्ती व अटीच्या आधीन राहुन न.प. हद्दीतील मौजा मोर्शी येथील शेत सर्व्हे नं. १७३/२ब क्षेत्रफळ ८१६९.८८ चौ. मी. जागेकरीता म्हणजे अकृषिक कामाकरीता (निवासी क्षेत्रासाठी) नाहरकत प्रमाणपत्र तात्वीक स्वरुपात देण्यात येत आहे.

**सहपत्र :-**

१. नकाशाची प्रत

**शहर नियोजन प्राधिकरण तथा मुख्याधिकारी,**
**नगर परिषद, मोर्शी**

**प्रतिलिपी :-**

१. मा. उपविभागीय अधिकारी, मोर्शी

आपणास सविनय सादर की, आपले संदर्भ क्र. १ अन्वये मौजा-येरला येथील शेत स.नं. १७३/२ब ८१६९.८८ चौ.मी. जमीन मोर्शी नगर परिषदेच्या हद्दीत असुन ती जमीन शासनाने मंजुर केलेल्या विकास योजना नकाशात जागा निवासी क्षेत्र दर्शविण्यात आलेली आहे. मा. आयुक्त तथा संचालक, नगर परिषद, प्रशासन मुंबई यांनी दिलेले स्थायी निर्देश क्र. ३३ प्रमाणे जमीन मालक यांनी अभिन्यासातील रस्त्यांचे खडीकरण, योग्य उताराच्या नाल्या, स्ट्रीट लाईट पोल्स, खुल्या जागेला तारेचे कुंपण, खुल्या जागेत रेन वॉटर हार्येवेस्टींग इत्यादी जमीन मालक यांनी स्वखर्चाने विकसीत करावी लागेल. त्या शिवाय महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४५ व महाराष्ट्र नगर परिषद, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १८९ मधील तरतुदीनुसार अभिन्यास नकाशास विकास परवानगीला मंजुरी देण्यात येणार नाही. वरील सर्व बाबींची पूर्तता न केल्यास अभिन्यासाला मंजुरी देण्यात येणार नाही. वरील अटीवर जमीन अकृषिक करण्यास न.प ची काही हरकत नाही, सविनय सादर.

२. मा. सहा. संचालक, नगर रचना विभाग, अमरावती
आपणास माहिती करीता रवाना.

**शहर नियोजन प्राधिकरण तथा मुख्याधिकारी,**
**नगर परिषद, मोर्शी**